# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
## ग्राहक तक्रार निवारण मंच
## कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. ११५–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. श्रीमंत भिमा नरळे,<br>मु. पो. कुणीकोणूर, ता. जत, जि. सांगली | अर्जदार |
| **विरूध्द** | |
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, विश्रामबाग, सांगली<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, कवठे महांकाळ, जि. सांगली<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>उप विभागीय कार्यालय, संख, जि. सांगली | विरूध्द पक्षकार |

<u>कोरम</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>
( ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल )
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. श्रीमंत भिमा नरळे, मु. पो. कुणीकोणूर, ता. जत, जि. सांगली यांनी नवीन घरगुती वीज कनेक्शन यासाठी दि. २७.८.२००७ रोजी वि.प.कडे अर्ज केला. तक्रारदाराचे म्हणण्यानुसार वितरण वाहिनीचा विस्तार असलेने दि. २६.९.२००७ पर्यंत चलन मिळणे जरुरी होते. तसे झाले नाही त्यामुळे प्रस्तुतची तक्रार दाखल केली आहे. तक्रारदार यांनी फी रु. २५/– पावती क्र. २२०३९३० दि २७.८.२००७ ने भरली आहे. तक्रारदाराने अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, सांगली यांचेकडे दि. २७.४.२०१० रोजी रितसर तक्रार दाखल केली.

अंतर्गत कक्षाने दि. २८.४.२०१० च्या आदेशानुसार तक्रारदारास एस.ओ.पी. प्रमाणे भरपाई द्यावी असे आदेश केले आहेत. तक्रारदार यांनी दि. ४.६.२०१० रोजी अनुसूचि अ मध्ये मंचाकडे तक्रार दाखल केली. त्यामध्ये त्यांनी विलंबापोटी कृती मानके विनियमातील तरतुदीनुसार भरपाई मिळावी अशी मागणी कैी आहे. तक्रार प्रतिनिधी मार्फत दाखल केली आहे.

वितरण कंपनीने आपल्या दि. १.७.२०१० च्या लेखी अहवालात तक्रारदाराचा शेतीपंप वीज पुरवठ्यासाठी दि. २७.८.२००७ रोजी अर्ज प्राप्त झाल्याचे मान्य केले आहे व त्यांस दि. ५.५.२०१० रोजी चलन देण्यात आले आहे. त्यांचे ०.३० कि.मी. लघुदाब वाहिनीचे काम आहे.

प्रस्तुतची तक्रार दि. २७.७.२०१० ला मंचासमोर सुनावणीस घेतली असतां, तक्रारदाराचे प्रतिनिधी श्री. खापरे हजर. वि.प.तर्फे प्रभारी सहाय्यक अभियंता संख श्री. मैंलापुरे व श्री. कुलकर्णी, कनिष्ठ अभियंता, कवठे महांकाळ विभाग उपस्थित. खालील मुद्दा निर्णयासाठी उपस्थित होतो.

१) तक्रारदार यांस मागणी केल्याप्रमाणे विलंबापोटी भरपाई मिळणे योग्य होईल काय ?

उत्तर : नाही

आदेश ?

खालील प्रमाणे.

<u>कारणमिमांसा</u>

तक्रारदार यांनी नवीन घरगुती कनेक्शनसाठी दि. २७.८.२००७ रोजी अर्ज करुन फी रु. २५/– भरली आहे. अंतर्गत कक्षाकडील आदेशात घरगुती चलन मिळणेच्या मागणीचा उल्लेख केला आहे, परंतु वि.प.ने आपल्या लेखी अहवालात शेतीपंप वीज पुरवठ्यासाठी दि. २७.८.२००७ रोजी अर्ज प्राप्त झाल्याचे मान्य केले आहे. वि.प.चे अधिकारी किती जागरुक आहेत अथवा किती हलगर्जीपणा करतात हे वि.प.ची बाजू मंचासमोर मांडतांना स्पष्ट होते. दि. ५.५.२०१० ल चलन देण्यात आले आहे ही बाब दि. १.७.२०१० च्या लेखी अहवालात आहे, परंतु मंचासमोर वि.प.च्या अधिकाऱ्यांनी दि. २७.७.२०१० रोजी मंचाला अग्रेषित केलेल्या तक्रारदाराच्या अर्जावर ८.५.२०१० अशी तारीख आहे व या तक्रार मागे घेत असल्याचा तक्रारदाराच्या अर्जाचा उल्लेख आपल्या दि. १.७.२०१० च्या लेखी अहवालात वि.प.चे अधिकारी का देवू शकले नाहीत. श्री. मैंलापुरे यांनी मंचासमोर दि. २७.७.२०१० ला अर्ज केला त्यात तक्रारदार यांनी दि.११.५.२०१० रोजी चलनाची रक्कम भरली आहे व चलन देण्यास विलंब झाला आहे हे मान्य केले आहे. त्यामुळे संबंधित तक्रारदारास १५ दिवसांत कनेक्शन देत असल्याचे लेखी हमी दिली आहे. त्यांस अनुसरुन ग्राहक प्रतिनिधी श्री. खापरे यांनी तक्रार मागे घेण्याची तयारी दर्शविली आहे. त्यामुळे वि.प.ने तक्रार मागे घेण्याची विनंती केली आहे, ग्राहकाने यांस दुजोरा दिला. मंचासमोर श्री. मैंलापुरे यांनी दि. २८.७.२०१० पासून १५ दिवसांत तक्रारदारास वीज कनेक्शन देण्याची तयारी दर्शविली असल्याने तक्रारदाराचे प्रतिनिधी यांनी तक्रार मागे घेत असल्याचे वि.प.च्या अर्जावर लेखी दिले आहे. त्यामुळे तक्रारदारास नुकसान भरपाई मिळण्याचा कायदेशीर हक्क प्राप्त झाला असला तरी तो प्रतिनिधींच्या संमत्तीने तक्रारदाराने सोडून दिला आहे. त्यामुळे मुद्दा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देणेत येत आहे. खालील प्रमाणे आदेश –

## आदेश

१) वि.प.ने दि. २८.७.२०१० ला अर्जात वि.प.च्या अधिकाऱ्यांनी मान्य केल्याप्रमाणे १५ दिवसांत वीज कनेक्शन देण्याचे आश्वासन दिल्याने तक्रारदाराने प्रतिनिधींच्या संमत्तीने तक्रार पूर्णपणे मागे घेतली आहे. तक्रारदाराने भरपाईचा हक्क सोडल्याने व तक्रार मागे घेतल्याने निकाली काढणेत येत आहे.

२) वि.प.च्या अधिकाऱ्यांनी मंचासमोर दि. २८.७.२०१० ला दिलेल्या लेखी आश्वासनाप्रमाणे तक्रारदारास १५ दिवसांत वीज जोडणी द्यावी.

३) खर्चाबाबत आदेश नाही.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( बी. जी. पवार )
अध्यक्ष

श्री. जी.बी.पानकर, सदस्य सचिव :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )
अध्यक्ष